● शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श


संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार - माजी आ. गोरंट्याल

## पीसीएम जालनाच्यावतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी






**जालना । प्रतिनिधी -** राज्यभरातील पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी येथे दिले. गुरुवार (दि. २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. गोरंट्याल बोलत होते. यावेळी पीसीएमचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, संस्थापक सरचिटणीस विजयकुमार सकलेचा, जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस माजी आ. गोरंट्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आचार्य जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले.पुढे बोलतांना माजी आ. गोरंट्याल दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा पुतळा बसविण्यासाठी आपण शंभर टक्के प्रयत्न करून त्याच बरोबरच राज्यातील पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या ज्या काही मागण्या आहेत. काँग्रेसच्या वरिष्ठांशी चर्चा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही गोरंट्याल म्हणाले.

प्रास्तविक करतांना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केले. तसेच आचार्य जांभेकर यांचे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. दर्पण आणि मासिक दिग्दर्शन या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात योगदान दिले. तर अनिष्ठ रुढी परंपरा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. त्यामुळे जालना महानगर पालिका हद्दीतील बस स्थानक ते छत्रपती संभाजीनगर रोड, लक्कडकोट मार्गास दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्यात यावे व याच भागात त्यांचा अर्धकृती पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी माजी आ. गोरंट्याल यांच्याकडे केली. तसेच शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार दर दोन वर्षांनी महागाई निदेशांकाची सांगड घालून वृत्तपत्रांना दरवाढ देणे आवश्यक असतांना गेल्या सहा वर्षांत एकदाही दरवाढ झालेली नाही, या व इतर पत्रकार वृत्तपत्रांच्या मागण्या मांडल्या. यापुर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह सध्याचे आमदार खोतकर यांना निवेदन दिले मात्र, त्यांनी निवेदनाची कोणतीही दखल अद्यापपर्यंत घेतली नाही. आपण पत्रकार वृत्तपत्रांच्या समस्यांकडे लक्ष देऊन समस्या सोडवाव्यात अशी विनंती माजी आ. गोरंट्याल यांना केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुहास वैद्य यांनी केले तर आभार शेख ईस्माइल यांनी मानले. दरम्यान, माजी आ. गोरंट्याल यांना पीसीएम जालनाच्यावतीने पत्रकार व वृत्तपत्रांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी ज्ञानेश्वर ढोबळे, शेख उमर, संदीप भाकरे, शेख नबी सिपोराकर, नरेंद्र जोगड, बद्री उपरे, संतोष भुतेकर, योगेश पिछाडे, राहुल भालके यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.

माजी आ. कैलास गोरंट्याल यांना दिलेल्या निवेदनात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे पत्रकारांचे आराध्य दैवत आहेत. या महापुरुषांचा अर्धकृती पुतळा जालना शहर महानगर पालिका हद्दीत बसविण्यात यावा. जालना शहरात विविध वृत्तपत्रांचे कार्यालय हे लक्कडकोट, छत्रपती संभाजीनगर रोड, भोकरदन नाका, छ.संभाजीनगर आदी भागात आहेत. त्यामुळे या मार्गास दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव या देण्यात यावे. या मागणीसह शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.१० यानुसार दर दोन वर्षांनी दरवाढ करण्याचे आदेश आहेत. ४.५.२ मध्ये नमुद कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे वाढीव दर देण्यात यावे. ( कारण- गेल्या सहा वर्षांपासून एकदाही दरवाढ करण्यात आली नाही.)

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.१ नुसार शासनाच्या अधिनस्त मंडळ-महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्य संस्था आदींना लघु संवर्गातील साप्ताहिकांना जाहिरात देण्याचे बंधनकारक करावे.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.५ मध्ये बदल करून भुसंपादनाच्या जाहिराती ह्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना प्रसिद्धीस देण्यात याव्यात. तसेच विभागीय माहिती उपसंचालकांकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीत लघु संवर्गातील साप्ताहिकास किमान एक जाहिरात देण्यात यावी

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.७ मध्ये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात ९ व एक ऐच्छिक जाहिरात देण्यात येत आहे. यात सुधारणा करण्यात यावी. व एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात.

यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (२५ डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, **पान २ वर**

युवा आदर्श

**पडसाद ...**

विचीत्र घडते घटना
सर्वत्र दिसे पडसाद
कडकडीत बंद करे
घालतात कुणीसाद
पेटवा चला शिवारां
सर्वपक्षीय प्रतिसाद
हवसेगवसे न् नवसे
तय्यार खाया प्रसाद
उलटसुलट बोलाया
असेल कुणा बिशाद
मिडिया भलती तेज
बातम्यांची ना ददाद
टपून बसले विरोधक
टिका फैरी मनमुराद
भडके खुशाल जंगल
फैलवावे दंगाफसाद
राजीनामा मागायचा
नेहमीचा असे प्रवाद
बरखास्त हो सरकार
धरुन ठेवा अट्टिवाद
बघ्यांची गर्दी अधिक
घेत राहतात आस्वाद
अडचणी व्यवस्थापना
कळेना करतो प्रमाद

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# बसस्थानक मार्गावर दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचा अर्धकृती पुतळा बसविण्यात यावा

## पीसीएम जालनाची मनपा आयुक्तांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा अर्धकृती पुतळा उभारण्यासह बसस्थानक-लक्कडकोट-भोकरदन नाका- छत्रपती संभाजीनगर या मार्गास त्यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालनाच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. आयुक्तांसाठी ओएस विजय फुलंब्रीकर यांनी निवेदन स्विकारले. यावेळी पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, शहराध्यक्ष सुहास वैद्य, संदीप भाकरे, नरेंद्र जोगड आदींची उपस्थिती होती. प्रसंगी ओएस विजय फुलंब्रीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

पीसीएम जालनाच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दर्पणकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी झाला. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी मराठी वृत्तपत्र दर्पण हे ६ जानेवारी १८३२ रोजी काढले. त्यानंतर मराठीतले पहिले मासिक 'दिग्दर्शन' त्यांनी इ.स. १८४० साली सुरू केले. मराठी वृत्तपत्र क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्याच बरोबर विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षण यांचा त्यांनी पुरस्कार केला. अनिष्ठ रुढी परंपरा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. महाराष्ट्र शासनाने ६ जानेवारी हा दर्पण दिन तथा पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याच बरोबर २० फेब्रुवारी या दिवशी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्याचे आदेशही महाराष्ट्र शासनाने दिलेले आहेत.

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे पत्रकारांचे आराध्य दैवत आहेत. या महापुरुषांचा अर्धकृती पुतळा जालना शहर महानगर पालिका हद्दीत बसविण्यात यावा. जालना शहरात विविध वृत्तपत्रांचे कार्यालय हे लक्कडकोट, छत्रपती संभाजीनगर रोड, भोकरदन नाका, छ.संभाजीनगर आदी भागात आहेत. त्यामुळे या मार्गास दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव या देण्यात यावे.




अर्धकृती पुतळा उभारण्यासह छत्रपती संभाजीनगर रोडला बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव येत्या १८ मे २०२५ पर्यंत देण्यात यावे, अन्यथा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने लोकशाही मार्गाने आंदोलनाचा ईशाराही देण्यात आला आहे.

# जालना शहर मनपा 'अति'...'रिक्त' आयुक्तच...

**जालना । प्रतिनिधी -** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची गुरुवार (दि २०) रोजी जयंती साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा अर्धकृती पुतळा बसविणे व बस स्थानक- छ. संभाजीनगर या मार्गास त्यांचे नाव देण्यात यावे या मागणीचे निवेदन देण्यासाठी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाचे शिष्टमंडळ महानगर पालिकेत गेले. मा. आयुक्त उपस्थित नसल्यामुळे अतिरिक्त आयुक्तांना निवेदन देण्याच्या मानस होता. मात्र, या अतिरिक्त आयुक्त महोदयांकडे निवेदन स्विकारण्यासाठी वेळ नसल्याचे कळाले, त्यामुळे ओएस विजय फुलंब्रीकर यांना निवेदन देण्यात आले.

मुळात जालना महानगर पालिका अतिरिक्त आयुक्तांचे नेमके कार्य काय? याचा बोध अद्यापपर्यंत जालनेकरांना झालेला नाही. यापुर्वी देखील समाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या नागरिकांसोबतच्या अरेरावीच्या भाषेबद्दल रोष व्यक्त केलेला आहे. सामान्य व गोर गरीब नागरिकांचे अतिक्रमण हटविण्यासाठी मनपा पुढाकार घेत आहे. धनदांडग्यांवर कारवाई का करत नाही? हे अनुत्तरीत आहे. शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या अनाधिकृत जाहीरातबाजींवर कारवाई करण्याऐवजी त्यांना अधिकृत करण्यावर मनपाचा भर का आहे? शहरातील विविध बायपास व कॉलनीला लागून असलेले अंतर्गत रस्ते तसेच छत्रपती संभाजी नगर रोड - भोकरदन नाका - बसस्थानक यासह मंठा चौफुली, अंबड चौफुली, राजुर रोड, कन्हैय्यानगर- देऊळगाव राजा रोड या महामार्गावरील अंतर्गत रस्त्यांचे काय? याचा रेकॉर्ड मनपाकडे नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

अतिरिक्त आयुक्तांनी शहरातील अस्वच्छतेवर लक्ष केंद्रीत करून शहर स्वच्छ करावे, घंटागाड्या किती सुरु आहेत, त्यासाठी त्यावर होणारा डिझेल व इतर खर्च किती होतो आहे. आयसीटी बेस प्रणालीच्या अनुषंगाने क्यु आर कोड घरीजावून स्कॅन केले जातात का? याकडे लक्ष द्यावे, शहरातील मनपाचे विविध ठिकाणी असलेले शॉपींग कॉम्पलेक्स किती वर्षांपासून आणि कुणाला लीज (भाडेतत्त्व) ने दिले याची चाचपणी करावी. आझाद मैदानजवळ असलेल्या शॉपींग कॉम्पलेक्सचा विचार केला तर अनेक गाळे भाडेतत्त्वावर कुणाला दिलेले आहेत याची नोंदच मनपाकडे नाही. या आणि यासह विविध समस्यांनी मनपाला घेरलेले आहे. यासारख्या गंभीर विषयाकडे मनपा अतिरिक्त आयुक्तांनी लक्ष देण्याची गरज आहे. कार्यालयात विविध मागण्या घेऊन आलेल्या सामान्य नागरिकांचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी अपेक्षा सामान्यांची असते.

वातानुकुलीत कॅबिनमध्ये बसून केवळ आणि केवळ आर्थिक हितसंबंध असलेल्यांनाच भेटायचे आणि इतर सामान्य नागरिकांना टाळायचे असाच काहीसा उद्योग तर मनपा अतिरिक्त आयुक्तांकडून होत नसेल ना? याची खातरजमा मनपा आयुक्तांने करणे गरजेचे आहे. मनपा अतिरिक्त आयुक्त यांनी त्यांच्या पदाला साजेशे काम करणे अपेक्षित असतांना अल्पकालावधीतच त्यांच्यावर सामान्यांचा रोष वाढत आहे. मनपा 'अति'...'रिक्त' आयुक्तच... अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ही बाब मनपा प्रशासनाच्या कार्यक्षमतेला साजेशी नाही. याबाबीकडे मनपा आयुक्तांसह जिल्हाधिकारी यांनी वेळीच लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# संपादकीय

## यशस्वी भव..

जगातील आठ सर्वोत्तम संघात खेळली जाणारी क्रिकेटची चॅम्पियन ट्रॉफी अर्थात मिनी वर्ल्डकप स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई येथे १९ फेब्रुवारी पासून सुरू झाली असून या स्पर्धेतील पहिला सामना यजमान पाकिस्तान व न्युझीलंड या दोन देशात पार पडला. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना काल म्हणजे २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशशी दुबईत झाला. हा लेख तुमच्या हाती पडेपर्यंत या सामन्याचा निकाल लागलेला असेल. भारताचा दुसरा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी रविवारी अर्थात २३ फेब्रुवारी रोजी दुबईत होईल. केवळ भारत पाकिस्तानमधील क्रिकेट रसिकांचेच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांचे लक्ष या सामन्याकडे लागले आहे. भारत पाकिस्तान हा हाय व्होल्टेज सामना दुबईत रंगणार असून नेहमीप्राणेच हा सामना अटीतटीचा होईल यात वाद नाही. भारताचा न्युझीलंडशी १२ मार्च रोजी मुकाबला होईल. भारताच्या गटात बांगलादेश, पाकिस्तान आणि न्युझीलंड हे देश आहेत. यातील भारत पाकिस्तान आणि न्युझीलंड हे तिन्ही देश या स्पर्धेतील माजी तसेच संभाव्य विजेते म्हणूनही गणले जातात त्यामुळेच या ग्रुपला ग्रुप ऑफ डेथ असे म्हंटले जाते. भारताला उपांत्य फेरी गाठायची असेल तर किमान दोन सामने जिंकावे लागतील ते ही चांगल्या धावगतीने कारण ग्रुप मधील तीन संघाने जर प्रत्येकी दोन विजय मिळवले तर ज्यांची धावगती चांगली आहे अशाच दोन संघाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. भारताला खरा धोका आहे तो पाकिस्तान आणि न्युझीलंड या दोन देशांशी कारण हे दोन्ही देश धोकेदायक समजले जातात. अलीकडच्या काळात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले असले तरी मागील म्हणजे २०१७ च्या चॅम्पियन ट्रॉफी मधील अंतिम सामन्यात पाकिस्ताननेच भारताला नमवले होते हे विसरून चालणार नाही. न्युझीलंड हा आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत कायम भारताला जड गेलेला देश आहे. आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत न्यूझीलंडचा भारताविरुद्धचा रेकॉर्ड चांगला आहे म्हणून भारताने या दोन्ही देशांशी खेळताना सतर्क राहायला हवे. जर भारताने या दोन देशांना नमवले तर भारत उपांत्य फेरीत पोहचेल. भारत उपांत्य फेरीत पोहचला तर अंतिम फेरीत नक्की पोहचेल इतकेच नाही तर भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव देखील कोरेल असा विश्वास अनेक दिग्गज आजी माजी क्रिकेटपटुंना आहे त्याचे कारणही तसेच आहे भारतीय संघ सध्या फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताने एकतर्फी विजय मिळवत इंग्लंडला व्हाईट वॉश दिला. विशेष म्हणजे या मालिकेत भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने इंग्लंड विरुद्ध शतक झळकावून फॉर्मात आल्याचे दाखवून दिले. ऐन चॅम्पियन ट्रॉफीच्या तोंडावर रोहित शर्मा फॉर्मात आला हे भारतासाठी शुभचीन्ह आहे. रोहित शर्मा फॉर्मात असला की तो भारताला एकहाती विजय मिळवून देतो. रोहित शर्मा सोबतच भारताचा मॅच विनर आणि जगातील सर्वोत्तम फलंदाज विराट कोहली हा देखील फॉर्ममध्ये आला आहे. हे दोघे भारताचे जय विरू आहेत. हे दोघे फॉर्मात येणे म्हणजे भारताचे निम्मे काम फत्ते होणे. या दोघांना शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि के एल राहुल यांची साथ मिळेल. यातील गिल आणि श्रेयस हे दोघेही फॉर्मात आहेत. राहुलने मोठी खेळी केली नसली तरी मोठ्या स्पर्धेत तो आपला खेळ उंचावतो. हार्दिक पांड्या आणि रविंद्र जडेजा हे भारतचे अष्टपैलू खेळाडू फलंदाजी आणि गोलंदाजीत कमाल करू शकतात तसेच त्यांचे क्षेत्ररक्षण ही उत्तम आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल हे फिरकीची तर मोहंमद शमी आणि अर्षदीप सिंग हे वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील. जसप्रीत बुम्राची उणीव जाणवणार असली तरी शमी आणि अर्षदीप आपल्या वेगवान गोलंदाजीने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणतील यात वाद नाही. भाराताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान या संघाकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिले जात असले तरी भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात बलाढ्य संघ आहे. जर भारताच्या खेळाडूंनी त्यांच्या क्षमतेनुसार खेळ केला तर २०१३ नंतर प्रथमच भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरेल आणि १४४ कोटी देशवासीयांना जल्लोष करण्याची संधी मिळवून देईल यात शंका नाही. भारतीय संघाला चॅम्पियन ट्रॉफीसाठी मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## पत्रकार व वृत्तपत्रांचे ...

विजयादशमी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.८ नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.१२ नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात.

एका आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या जाहिराती ह्या ४०० चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात.

साप्ताहिकांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान ५ व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी

ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात.

शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान ३० दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी. या मागण्यांचा समावेश आहे.

# मातृभाषा ही ईश्वरी देण... प्रत्येक व्यक्तीची आन बाण शान

जगात कुठेही जा परंतु मातृभाषेला विसरू नका. आज प्रत्येक देशात मातृभाषेला आगळेवेगळे महत्व आहे. त्याचप्रमाणे भारतात सुध्दा प्रत्येक राज्यात मातृभाषेला आगळे वेगळे स्थान आहे. मातृभाषा शिकविली जात नसून जन्मताच अवगत असते याला ईश्वरी देणच म्हणावे लागेल. त्यामुळे जगातील कोणताही व्यक्ती असो त्याला आपल्या मातृभाषेचा गर्व आणि अभिमान असने सहाजीकच आहे आणि असायला सुध्दा पाहिजे. जगामध्ये प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचे महत्व कळावे या उद्देशाने नोव्हेंबर १९९९ मध्ये यूनेस्को येथे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दीवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण २१ फेब्रुवारी १९५२ मध्ये ढाका युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्कालीन पाकिस्तान सरकारच्या भाषा नितीचा विरोध केला होता.कारण त्यांना आपल्या मातृभाषेचे अस्तीत्व टीकवुन ठेवायचे होते.प्रदर्शनकारी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी होती की बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा मिळावा. परंतु अशा परीस्थितीत पाकिस्तान पुलिसने प्रदर्शनकारी विद्यार्थ्यांवर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला.परंतु विरोध थांबला नाही.अंततः पाकिस्तान सरकारला बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा द्यावा लागला. मातृभाषेच्या आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या युवकांना श्रध्दांजली देण्यासाठी यूनेस्कोने नोव्हेंबर १९९९ ला जनरल कांफ्रेंसमध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला व २१ फेब्रुवारी ही तारीख ठरवीण्यात आली. तेव्हापासुन संपूर्ण जगात २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केल्या जावु लागला. संयुक्त राष्ट्रानुसार जगात बोलल्या जानाऱ्या एकुण भाषा साधारणतः ६९०० आहेत.यात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या १० भाषेमध्ये इंग्रजी,मंदारीन, हिंदी,जापानी,रूसी,बांग्ला,पुर्तगाली, अरबी,पंजाबी आणि स्पेनिश इत्यादी आहेत.भारताचा विचार केला तर मातृभाषेला आगळेवेगळे महत्व दीसुन येते.भारतात प्रत्येक ४० कीलोमिटर नंतर आपल्याला भाषा बदलतांना दीसते.ज्या प्रमाणे म्हटल्या जाते, कोस-कोस पर पाणी बदले,चार कोस पर वाणी याप्रमाणे भारतात मातृभाषा बदलतांना दीसते.महाराष्ट्राची मातृभाषा मराठी जरी असली तरी प्रत्येक ४० कीलोमीटर नंतर लोकांच्या रहानीमानासह भाषांमध्ये व संस्कृतीमध्ये आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचा गोडवा पहायला मिळतो.भाषेचा विचार केला तर भारताची भाषा व संस्कृती ही जगावेगळी असल्याचे दिसून येते.भारतात अनेक जातींचे, पंथाचे,धर्माचे लोक राहतात.भारतात २८ राज्य व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत.त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्याची मातृभाषा वेगळी आहे. त्यातही प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ४० कीलोमिटरच्या अंतरावर भाषेचा वेगळा गोडवा दीसुन येतो.भारतात हिंदी दिलं की धडकन तो मातृभाषा दिलं की आवाज यापध्दतीने मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा सन्मान केल्या जातो.वल्ड लँग्वेज डेटाबेसनुसार २२ व्या संस्करण इथोनोलॉजच्यानुसार जगातील २० सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची भाषा मानल्या जाते.ज्याप्रमाणे मातृत्व आणि पितृत्व महत्वाचे आहे.त्याचप्रमाणे प्रत्येक देशाची मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषा महत्त्वाची असल्याचे मी समजतो.जगात अनेक भाषांचे भंडार आहेत यात दुमत नाही.त्या संपूर्ण भाषा अवगत केल्याही पाहिजे यामुळे ज्ञानाचा भंडार वाढतो.परंतु त्या भाषेच्या आड मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.आजही भारतात इंग्रजी भाषेला जास्त महत्व दील्या जाते हे दुर्भाग्य म्हणावे लागेल. भारतातील नामांकित व्यक्ती किंवा हायप्रोफाइलमध्ये रहाणारे किंवा वॉलिवुडमधील व्यक्तीसुध्दा इंग्रजी भाषेला महत्व देवून मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेला विसरतांना दिसतात.याला सरकारने कोठेतरी थांबवीले पाहिजे.यामुळे मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा अपमान होतो.जगातील कोणताही देश असो प्रत्येकाची मातृभाषा म्हणजे पुर्वजांचा एक ठेवाच आहे.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतेही कार्य करतांना किंवा बोलतांना मातृभाषेला प्रथम स्थान द्यायला पाहिजे. प्रत्येकांची मातृभाषा ही त्या-त्या संस्कृती नुसार अवगत असते.त्यामुळे आपण जर बाहेर निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर नंतर आपल्याला प्रत्येक भाषेत थोडा-थोडा बदल झालेला दिसतो. सांगायचे तात्पर्य की देशात किंवा जगात कुठेही जावे परंतु मातृभाषेचा विसर पडणार नाही याची काळजी सर्वांनीच जातीने घेतली पाहिजे. जगातील संपूर्ण भाषेचा व संस्कृतीचा अभ्यास करायलाच पाहिजे.परंतु आपल्या संस्कृतीला किंवा मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याचीही सुध्दा काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परीस्थितीत आपण पहातो आई-बाब, काका-काकु, मामा-मामी,आजी-आजोबा,माऊशी-मावसा इत्यादी अनेक जुन्या शब्दांना विसरून मम्मी,डॅडी,पप्पा,मॉम,अन्टी इत्यादी अनेक इंग्रजी शब्दांचा वापर होतांना आपण पहातो. त्याचप्रमाणे मामी-मामा, काका -काकु,माऊशी-माऊसाजी या शब्दाला आगळे वेगळे महत्त्व आहे.कारण यातुनच नात्याची वेगवेगळ्या पध्दतीने ओळख दिसून येते.परंतु आता या नावाचे महत्व विसरून या सर्वांना अन्टी व अंकल मध्ये परीवर्तीत केल्याचे दिसून येते.हे मातृभाषेच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे मुलांना बालपणापासून मोबाईलची सवय लावल्याने सुध्दा मातृभाषेचा विसर होतांना दिसतो.याचा परीणाम मातृभाषेवर होवु शकतो याला नाकारता येत नाही. भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत हासुध्दा भारताचा इतिहासच आहे.प्रत्येकाने जर आपल्या मातृभाषेचा सटीक वापर केला तर भारतातील प्रत्येक व्यक्तीला अनेक भाषा आपोआपच अवगत होतील व सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात भाषेचा भंडार आपोआप निर्माण होईल.यामुळे प्रत्येकाचे भाषेचे ज्ञान मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होईल. भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की लोकसभेत किंवा राज्यसभेत काही सांसद मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषा (हिंदीचा) वापर न करता इंग्रजी भाषेचा वापर करतात यावर आंतरराष्ट्रीय मातृभाषेच्या निमित्ताने अंकुश लावण्याची गरज आहे.कारण अनेक देशांत आताही त्यांच्याच देशातील भाषा बोलल्या जाते उदाहरण द्यायचे झाले तर जापान, चीन, स्पेन,अरबी, रशिया, जर्मनी, इस्त्रायल इत्यादी अनेक. त्यामुळे भारतातील प्रत्येक भाषेला महत्व देण्याची आवश्यकता आहे.मी देशातील जनतेला हेच सांगु इच्छितो की इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषेचा उपयोग जास्तीत जास्त केला तर येणारी पीढी याचे स्वागतच करेल.त्यामुळे देशासह जगातील प्रत्येक व्यक्तीने मातृभाषेचा आदर व मानसन्मान करावा. मातृभाषा ही प्रत्येक व्यक्तीची आन बाण शान व ईश्वरी देण असुन समुद्रापेक्षाही अफाट व शक्तीशाली आहे कारण सर्वांच्याच ज्ञानाचे उगमस्थानच मातृभाषेतूनच झाले आहे.



**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर,**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मराठी माणसासाठी अभिमानास्पद!

अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपुर्ण मराठी भाषेला भारत सरकारने दर्जा दिला आहे. यासाठी मराठी माणसाला अनेक वर्ष संघर्ष करावा लागला. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे खालील प्रमाणे निकष ठरवलेले आहेत.

भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे., भाषेचे वय दिड ते अडीच हजार वर्षाचे असावे., भाषेला स्वतःचे स्वयंभु पण असावे., प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रुप यांचा गाभा कायम असावा.

अभिजात भाषा हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो, त्या भाषेच्या सार्वागिंण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान दिले जाते. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम, उडिया, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत आणि आसामी अशा अकरा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न सुरु होते. यासाठी महाराष्ट्र राज्य शासनातर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने ५०० पानांचा अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला. ३ ऑक्टोंबर, २०२४ रोजी, केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अभिजात भाषा या शब्दाचा इंग्रजीत शास्त्रीय भाषा असा भाषांतर अर्थ आहे. केंब्रिज डिक्शनरी मध्ये परिभाषीत केलेले एलिट म्हणजे समाजातील सर्वात श्रीमंत, सर्वात शक्तीशाली, सर्वोतम शिक्षित गट होय.

मराठी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोली भाषेपासून झाला असल्याचे बहुतांशी मानले जाते. मराठीसह भारतीय भाषेची जननी संस्कृती भाषा असल्याचे विद्वानांचे मत आहे. मराठी भाषेची स्वतंत्र साहित्यिक परंपरा आहे. प्राचीन लिखित साहित्याचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मराठी भाषेला ऐतिहासिक महत्व आहे. मराठी भाषेला समृध्द व सांस्कृतिक वारसा आहे. अभिजात भाषांमध्ये वेगवेगळया वर्गाचे प्रकार आहेत. नोकरशाही, कॉर्पोरेट, बौध्दीक, लष्करी, प्रसार माध्यमे आणि सरकारी उच्चभ्रूंचा समावेश असून, देशातील किंवा राज्यातील प्रमुख संस्थावर त्याचे नियंत्रण असते. यामुळे या सर्वाची मते आणि कृतीचा शासनाच्या धोरणकर्त्याच्या निर्णयावर प्रभाव पडताना दिसतो. जगा बद्दल आणि संस्कृती कला, साहित्य इत्यादीबद्दल, भरपुर अनुभव व ज्ञान असणे, किंवा दाखविणे हे सुध्दा अभिजात भाषेचे लक्षण मानले जाते. शिष्टाचारी लोकांमध्ये स्वतःशी प्रामाणिक राहण्याची अद्भुत क्षमता असते. ते कुणाचीही नकल करत नाहीत, अशा अभिजात वर्गातील लोकांना विशेष अधिकार प्राप्त असतात. भारताच्या महाराष्ट्र, गोवा, गुजरात, छत्तीसगड, कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यामध्ये मराठी बोलली जाते. दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशातही मराठी बोलली जाते. बोली भाषा व प्रमाण मराठी भाषा हे दोन प्रकार मराठी भाषेच्या विद्वानांनी सांगितले आहेत. मराठी ही इंडो आर्यन भाषा कुळातील असल्याचे भारतीय विद्वान सांगतात. मराठीच्या कोंकणी, अहिराणी, वऱ्हाडी, मराठवाडी, कोल्हापुरी, मराठी, कारवारी मराठी, संगमेश्वरी, बेळगावी, मालवणी, मोरस मराठी, झाडी बोली, तंजावर, बागलाणी, नंदुरबारी, बोली भाषा आहेत. बोली भाषेचे मराठी भाषेशी कायमचे नाते असुन, दर १२ कोसागणिक उच्चारात, शब्द संग्रहात, आधातांत व वाक्यप्रचारात बदल दिसतो. असे असले तरी लिखित भाषेत फारसा फरक दिसत नाही. महाराष्ट्रात आदिवासी समुहाच्या भिल्ल, गोंड, वारली, पावरी, नावाची कोरकू, कोलामी, कातकरी, माडिया आदी भाषा असून गोंडी व भिल्ली अतिप्राचीन भाषा आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही महाराष्ट्रातील मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे. मराठी अभिजात भाषा गौरव दिन दरवर्षी ३ ऑक्टोंबरला साजरा केला जाणार आहे. कारण याच दिवशी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. या निमित्ताने मराठी भाषेच्या भविष्यासाठी नव्या पिढीला प्रोत्साहन देणे आणि भाषेचे संगोपन करायची जबाबदारी स्विकारने आवश्यक आहे. मराठी अभिजात भाषा गौरव दिन महाराष्ट्रात सण म्हणुन साजरा करण्यात यावा यामुळे भाषेची अभिमानास्पद पंरपरा व वारसा जपला जाईल, आणि नवीन पिढीला प्रेरणा मिळेल.

**प्रा. डॉ.राजेंद्र साहेबराव सोनवणे,**
**जेईएस महाविद्यालय, जालना.**

# परीक्षेला जाताना...

दहावीच्या परीक्षेला जाताना विद्यार्थ्यांनी आपले लिखाणाचे साहित्य, पारदर्शक लेखन पॅड, हॉल तिकीट, शाळेचे आय कार्ड, पाण्याची बॉटल, आवश्यकता वाटल्यास १-२ लेमनच्या गोळ्या किंवा चॉकलेट इत्यादी साहित्य सोबत घ्या. सकाळी छान फ्रेश व्हा. हलकासा नाश्ता करा. घरातील वरिष्ठांचा व आई-वडिलांचा नमस्कार करा. आपला सर्व अभ्यास झालेला आहे व आपण संपूर्ण पेपर लिहिणार आहोत हे स्वतःला सांगा. परीक्षेला जाताना आपल्या शाळेच्या युनिफॉर्मवरच जा. परीक्षा सेंटरला ४५ मिनिटे आधी पोहोचा. परीक्षा सेंटर मधून मिळणाऱ्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करा. परीक्षा हॉलमध्ये उत्तर पत्रिका अर्धा तास आधीच तुम्हांला मिळणार आहे तेव्हा उत्तर पत्रिकेवरील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा. उत्तर पत्रिकेतील समास व इतर सर्व माहिती सीट नंबर, उत्तर लेखनाची भाषा, केंद्र क्रमांक, सही, विषय, पेपर क्रमांक, दिनांक ही सर्व माहिती भरा. ही सर्व माहिती स्वतःच्या हॉल तिकीट वरून तपासून घ्या. समास पानाच्या दोन्ही बाजूला योग्य प्रमाणात सोडा. समासात डावीकडे प्रश्न क्रमांक हा उत्तर पत्रिकेच्या वर पानाच्या डाव्या बाजूला कोपऱ्यात असलेल्या चौकोनात लिहा. समासात डाव्या बाजूला उपप्रश्न व क्रमांक लिहा. डाव्या बाजूला समासात तीन रेषा ओढा. पहिली रेषा ही एक्झामिनारला मार्क लिहिण्यासाठी सोडा, तिथे काहीही लिहू नका पुढच्या रेषेवर उपप्रश्न क्रमांक लिहा. त्यानंतर उत्तर लिहिण्यासाठी आवश्यक अशी बाणाची खून करा. एक्झामिनारला आपली उत्तरे तात्काळ लक्षात येथील अशा पद्धतीने लिहा. उत्तरातील महत्त्वाचे शब्द किंवा वाक्यांखाली पेन्सिलने रेषा मारा. रेषा मारताना पट्टीचा वापर करा. उत्तर पत्रिकेतील आपले अक्षर वाचनीय असणे अत्यंत आवश्यक असते तसे नसल्यास आपल्या गुणांवर परिणाम होतो. रिकाम्या जागा लिहितांना उत्तरांना बॉक्स करा. प्रत्येक नवीन प्रश्न नवीन पानावर सुरू करा. प्रत्येक प्रश्न संपल्यावर एक ओळ सोडा व दोन प्रश्नांमध्ये पेन्सिलने रेषा मारा. स्केच पेन, मार्कर पेन, हायलाईटर इत्यादीचा वापर करू नका. कुठेही लाल पेनाचा वापर करू नका. प्रश्न पत्रिका ज्या क्रमाने असते त्याच क्रमाने उत्तर पत्रिकेत उत्तरे लिहा. उत्तर पत्रिकेत कुठेही खाडाखोड होणार नाही याची काळजी घ्या. उत्तर पत्रिकेत प्रश्न लिहिण्याची अजिबात आवश्यकता नाही मात्र प्रश्न क्रमांक व त्याचा उपक्रमांक नीट लिहा. उत्तराच्या मुद्द्यांना क्रमांक टाकताना ते शक्यतो रोमन अंकात टाकावेत पेपर संपल्यावर उत्तर पत्रिकेच्या उरलेल्या कोऱ्या पानांवर व प्रश्नांनखालील रिकाम्या जागांवर पेन्सिलीने तिरपी रेषा मारा. शेवटी आपण लिहिलेली उत्तरे पुन्हा एकदा वाचा.

**सहशिक्षक, प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ९९६७८१७८७६**
**श्री. के.रा.कोतकर माध्य. उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली.**

# जीवनात अपयशाने कधीही खचून न जाता नवीन संधी शोधण्याचा प्रयत्न करा - जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी कठोर मेहनत करणे अत्यंत गरजेचे आहे. मेहनत केल्यास यश हे हमखास मिळते. तुमच्या तारुण्याच्या या काळात चांगल्या मित्रांची संगत ही सुद्धा खूप महत्वाची आहे, असे संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले.

जालना शहरात संभाजीनगर प्रभागात असलेल्या शांतिनिकेतन विद्यामंदिर या शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, जीवनात यशस्वी होऊन केवळ पैसा मिळवणे हाच हेतू न ठेवता समाजाची सेवा करणे अत्यंत गरजेचे आहे. यातूनच चांगला व्यक्ती म्हणून तुमचे नाव लौकिक होईल व त्यातून तुमचे आई-वडिल, शाळा व गुरुजन यांचे नाव मोठे होईल. अनेक यशस्वी झालेले विद्यार्थी भेटतात तेव्हा त्यांचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. या स्पर्धेच्या युगात

कधी कधी जीवनात अपयश वाट्याला येते तेंव्हा खचून निराश होऊ नका तर त्यातून नवीन संधी शोधण्याचा प्रयत्न करा. असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी व्यासपीठावर शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दीपक रणनवरे, माजी नगरसेवक विजय पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. निरोप समारंभाचे या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास घायाळ यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रेमला पंडित, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, शिक्षक अंबादास घायाळ, संदीप वाखरकर, सीमा इंगळे, कांचन वाघ, शिवहरी मांटे, कीर्ती खैरे, अरुणा मांटे, सुमित्रा शर्मा, वसंत गाडेकर, तुकाराम चव्हाण आदींनी प्रयत्न केले.





जालना शहर महानगर पालिकेचे ओएस विजय महाराज फुलंब्रिकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देतांना प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, शहराध्यक्ष सुहास वैद्य, संदीप भाकरे, नरेंद्र जोगड आदी.

# जालन्यात देशी व विदेशी दारूच्या १९ हजार ९६० रुपये किंमतीच्या १७१ बाटल्या जप्त

**जालना । प्रतिनिधी -** देशी व विदेशी दारूच्या १९ हजार ९६० रुपये किंमतीच्या १७१ बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

दिनांक १९/०२/२०२५ छत्रपती शिवाजी महाराज जयंती चे अनुषंगाने सदर बाजार पोलीसांची पोस्टे हददीमध्ये पेट्रोलिंग सूरू असताना अवैध दारू विक्री बददल विशेष मोहिम राबवून गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहिती वरून तीन वेगवेगळया ठिकाणी विदेशी व देशी दारूची विक्री होत आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाले वरून पोलीस निरीक्षक संदीप भारती



यांचे मार्गदर्शन व सूचनाप्रमाणे शहरातील चमडा बाजार कब्रस्थान जालना, शारदाबाई कंपाउंड जालना, मोदीखाना जालना असे तीन ठिकाणी छापे मारले असता तीन ही ठिकाणी विदेशी व देशी दारू ची चोरटी विक्री करताना तीन इसम मिळून आल्याने त्यांचे ताब्यातून वेगवेगळया कंपनीच्या १९९६० रूपये किमतीच्या एकूण १७१ बाटल्या जप्त करण्यात आलेल्या आहेत.

सदर इसमांविरूध्द दारू बंदी कायदयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्या आहेत.

सदरची कामगीरी मा.पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयूष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकणी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप भारती साहेब यांचे नेतृत्वात डी.वी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ रामप्रसाद रंगे, पो.ना पटेल, पोकॉ दुर्गेश गोफणे, पोकॉ गणेश तेजनकर, पोकॉ अजीम शेख यांनी केली.

# इंदेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा समारोप




**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील येथे महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा समारोप दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता करण्यात आला आहे. यावेळी महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार वनंजे, प्रा. स्मिता चव्हाण, प्रा. सुवर्णा चव्हाण, मनोहर उघडे, रमेश शिरसाट, प्रकाश पांडव, विद्याधन उघडे, प्रा. हिवराळे, प्रा. शिंदे, प्रा. कहाळे, प्रा. गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

इंदेवाडी येथे मागील ७ दिवसापासून महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजने अंगर्तत विशेष श्रमदान शिबीर सुरु होते. या शिबीरात विद्यार्थ्यांनी श्रमदानाबरोबरच विविध उपक्रमात देखील सहभाग नोंदविला होता. गावची स्वच्छता, जनजागृतीपर रॅली, विविध प्रोधनात्मक घोषणा आदी उपक्रम गावामध्ये राबविण्यात आले. या शिबीराचा समारोप विद्यार्थ्यांनी गावातून रॅली काढून करण्यात आला.

# शिवराय हे सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन चालणारे जाणता राजा होते - आ. अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** शिवराय हे केवळ एका समाजाचे नव्हते, तर संपूर्ण अठरापगड जाती-धर्मांना सोबत घेऊन चालणारे खरे जाणता राजा होते. त्यांच्या कारकिर्दीत कुठलाही जातिभेद नव्हता. छत्रपती संभाजी महाराजांनी धर्मासाठी अपार यातना सहन केल्या. त्यामुळे आपण आज सुरक्षित आहोत. आपला इतिहास न विसरता पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावा, असे प्रतिपादन जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना केले.

निवृत्ती महाराज पाचफुले यांच्या संकल्पनेतून बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून पाचफुले फाऊंडेशनची स्थापना आ. खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येऊन, जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत, अडतिया असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, कार्याध्यक्ष तथा पाचफुले फाऊंडेशनचे अध्यक्ष निवृत्तीराव पाचफुले, शिवसेना शहरप्रमुख तथा फाउंडेशनचे सचिव विष्णु पाचफुले, फेरोजलाला तांबोळी, जालना मर्चंट बँकेचे व्हाइस चेअरमन अनिल सोनी, रमेश तोतला, अनिल पंच, अमोल ठाकुर, हुकुमचंद पाटणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मोहन राठोड, उपसचिव अनिल खंडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. खोतकर पुढे म्हणाले की, निवृत्ती महाराज पाचफुले यांनी या संस्थेची स्थापना करून समाजोपयोगी कार्याला वाहून घेतले आहे. पाचफुले परिवार धार्मिक, सामाजिक, राजकीय आदी विविध क्षेत्रात अग्रेसर आहे. माझे पाचफुले परिवारासोबत पारिवारिक जुने संबंध आहेत. माझे सहकारी मित्र निवृत्तीराव महाराज पाचफुले यांच्या हातून पाचफुले फाऊंडेशनच्या माध्यमातून अधिकाधिक लोकोपयोगी कार्य होवो, अशा सदिच्छा त्यांनी दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार पाचफुले फाऊंडेशनच्यावतीने करण्यात आला. प्रारंभी निवृत्ती महाराज पाचफुले यांनी फाउंडेशन स्थापनेचा उद्देश विशद केला. फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक, पर्यावरण विषयक उपक्रम राबविले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कु. आराध्या प्रविण पाचफुले हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाल स्वरूपाची वेशभूषा परिधान केली होती. शिवरायांचे हे बालस्वरूप




सर्वांचे आकर्षण ठरले.

याप्रसंगी मनोज पाचफुले, प्रविण पाचफुले, विनोद पाचफुले, अशोक पाचफुले, सुरेश वाबळे, सुदर्शन भुंबर, गणेश नन्नवरे, विलास पवार, अनिल ठक्कर, हरेश केनिया, राम नारायण पल्लोड, अर्जुन कचरे, दिपक पित्ती, संजय कानडे, रामेश्वर बोडखे, रमेश वाबळे, सचिन आनंदे, कृष्णा सांवत, गणेश गवारे, रमेश हारबक, उद्धव तौर, विक्रम ढाकणे, कृष्णा डवले, हमीदभाई, अरुण तापडिया, जगदिश भुंबर, सुधाकर गुळमकर, राजु गुळमकर, सागर बोकण, रघुनाथ मोरे, राम गुलगे, साहेबभाई, गजानन थोरात, सुनिल सरकटे, रोहित भानुशाली, सुदाम मोरे, भगवान ठोकळ, श्रीनिवास मिसाळ, मंगेश मिसाळ, ज्ञानेश्वर पवार, प्रविण कुचेरिया, रामु सोमाणी, त्रिंबक जावळे, कैलास टिळेकर, विशाल भिसे, दत्तु शेवाळे, दत्तात्रय जाधव, अरुण लाहोटी, संदीप कचरे, संदीप मोरे, अंकुश गोल्डे, अर्जुन थेटे, साईराज पाचफुले, विजय लोहिया, पंढरीनाथ शेळके, नारायण जगताप, दुर्गेश जगताप यांच्यासह व्यापारी, शेतकरी, गुमास्ता, हमाल, मापाडी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार विष्णु पाचफुले यांनी मानले.

# भव्य मिरवणुकीने शिवजयंती उत्साहात

## शोभायात्रा : कोल्हापूर मर्दानी खेळ हलगी वाद्य संबळ वाद्य, ढोल पथकाचा दणदणाट

**मंठा । प्रतिनिधी -** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती ,सार्वजनिक, शिवजयंती उत्सव समितीतर्फे बुधवारी ( ता. १९) उत्साह आणि जल्लोषात साजरी करण्यात आली.

साई ढोल पथक , घोड्यावर स्वार छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, हातात भगवे ध्वज घेऊन छत्रपती शिवरायांवर आधारित गाण्यांवर फिरणारी तरुणाई, अशा लक्षवेधी शोभा यात्रेने शहरात जणू शिवशाही अवतरल्याचा अनुभव मंठेकरांनी घेतला. द वर्ड इंग्लिश स्कूल, ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल, माऊली इंग्लिश स्कूल, गुरूकुल इंग्लिश स्कूल, या शाळेने देखावे साजरे केले.

सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौक येथे

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल बोराडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष अमोल बोराडे तर सचिव शामराव देशमुख उपाध्यक्ष निवृत्ती बोराडे अमोल माने, कोषाध्यक्ष विजय बोराडे, सहकोषाध्यक्ष रामेश्वर भोसले , सचिव शामराव देशमुख ,सहसचिव सचिन चव्हाण अनिल बोराडे, प्रसिद्धीप्रमुख. आकाश आघाम, करण बोराडे ,गोविंद बोराडे, कृष्णा बोराडे, गजानन माळकर, संघटक, गोपाळ गायकवाड, पांडुरंग बोराडे ,बाळू खरात, गणेश बोराडे, शिवाजी बोराडे, सुजित बोराडे ,विकास बोराडे, भागवत बोराडे, सदस्य.. सतिश राठोड, ओमकार बोराडे, आदित्य मोरे, लक्ष्मण बोराडे रामेश्वर बोराडे सतीश कळणे कुलदीप बोराडे यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार समिती कैलास बापू बोराडे, शिवाजी जाधव, संजय बोराडे ,एकनाथ काकडे ,रणजीत बोराडे, विष्णू वायाळ ,बाजीराव बोराडे ,शामराव काकडे, संतोष बोराडे ,दिगंबर बोराडे, सर्जेराव काका बोराडे, सुनील ठोंबरे, चंदू भाऊ बोराडे ,गजानन बोराडे, प्राचार्य नेताजी मुळे, शरद पोटे यांची उपस्थिती होती.

व्याख्याते शिवशाहीर एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकत शुभेच्छा दिल्या.

छत्रपती संभाजी महाराज चौक येथून वाजत - गाजत मिरवणूकीस प्रारंभ झाला. मेन रोड मार्गे जात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात व्याख्याते डॉ एकनाथ शिंदे यांचे व्याख्यान झाले व नंतर शोभा यात्रेचा समारोप करण्यात आला.



# जानेफळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रंगारंग कार्यक्रम संपन्न



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील जानेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ७ च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतरंग कार्यक्रमाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. यावेळी प्रेक्षकांनी नृत्यप्रकारांची बहारदार मेजवानी अनुभवली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंगळागौर, बाईपण भारी देवा, आरंभ ,कच कच कांदा,सोल्जर डान्स,हनुमान चालीसा,साऊथ मिक्स,सामी,चला जेजुरीला जाऊ,करिष्मा स्पेशल, चोगडातारा, काली बिंदी,लाडकी बहीण नाटिका आधी कलाकृती विशेष दाद देऊन गेल्या. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शिक्षिका सविता बरंडवाल व सीमा रिंढे यांनी केले. कार्यक्रमाला सरपंच अनिता पंडित, समिती अध्यक्ष शिवाजी शिनगारे,शिक्षक पतसंस्थेचे संचालक संजय निकम, दयानंद राऊत, मनोज मुरकुटे सतीश राऊत, गजानन लोखंडे, अंकुश पंडित,अनिल पंडित, मनोज कणखर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक प्रदीप ताठे, संदीप डोईफोडे,प्रवीण लादे आदींनी पुढाकार घेतला.

# ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील वखारी येथील ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. विद्यार्थ्यांनी करिअरची वाट निवडताना आपली आवड आणि क्षमता लक्षात घेऊन आपल्या पसंतीच्या करिअर निवडीला प्राध्यान्य द्यावे, असे प्रतिपादन प्रमोद घोंगे सर यांनी यावेळी केले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष भगवानराव खैरे संस्थेचे सचिव प्राचार्य अण्णाभाऊ भालमोडे ,जेष्ठ शिक्षक शंकर सांगळे, सिंधु घोलप, हरिष खराडे,मारुफ खान सर, विशाल डोंगरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शाळेविषयी व आपल्या गुरुजनांविषयी आपला ऋणानुबंध कायम ठेवला पाहिजे. शिक्षक आणि व्यवस्थापन देखील शाळेतील सर्व मुले आपली मुले आहेत या दृष्टिकोनातूनच बघत असतात. आपल्या विद्यार्थ्याने यशाची सर्वोच्च शिखर गाठावे असेच नेहमी शिक्षकांना वाटते. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी नेहमीच शिक्षकांचा आदर करावा असे अध्यक्ष भगवानराव खैरे म्हणाले. तसेच मुलांनी आत्तापासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करावी असे प्रतिपादन प्राचार्य भालमोडे सर यांनी केले.तसेच मुलांनी यावेळी स्कूल साठी मोठी समई गिफ्ट दिली.सूत्रसंचालन प्रदीप अवचार यांनी केले तर आभार प्रदर्शन हरिष खराडे यांनी केले.यावेळी शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# छाबडा हॉस्पीटलच्या आरोग्य शिबीरात १३० रूग्णांची मोफत तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील छाबडा हॉस्पीटलच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त छाबडा हॉस्पीटल, लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चंट सिटी व रेड स्वस्तिक सोसायटी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१६) घेण्यात आलेल्या मोफत मधुमेह (डायबेटीज)निदान, चिकित्सा, उपचार शिबीरात १३० रूग्णांची मोफत शुगर व आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चन्ट सिटीचे अध्यक्ष पवन देशमुख, सचिव लॉ. आनंद वाघमारे, लॉ. अरविंद नाईक, लॉ. डॉ. मनिष अग्रवाल, लॉ. सुनिल भगत, लॉ. फदाड, लॉ. सतीश बगडिया, लॉ. डॉ. आनंद अग्रवाल, लॉ. पंडीत, लॉ. बंकट खंडेलवाल, लॉ. अंकुशराव राऊत,लॉ. आनंद वाघमारे, रेड स्वस्तीक सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र अग्रवाल, सचिव प्रा. मोहन शिंदे, लॉ. विजय दाड, इंद्रजित जाधव , रमेश देहेडकर आदिंची उपस्थिती होती. यावेळी मधुमेह व हृदयरोग तज्ञ डॉ. धीरज छाबडा, बालरोग तज्ञ डॉ.तरूणा छाबडा यांनी रूग्णांची तपासणी केली.

यावेळी बोलतांना डॉ.धीरज छाबडा म्हणाले की, आजच्या धावपळीच्या जीवनात मधुमेह आजार चुकीची जिवनशैली व व्यायामाचा अभाव यामुळे वाढत आहे. याबद्दल जागतीक आरोग्य संघटनेने वेळोवेळी आकडेवारी प्रसिध्द केली आहे. त्यांच्या अभ्यासानुसार भारतात १० कोटी मधुमेहाचे रूग्ण आहेत. व जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारतात २० कोटी मधुमेह रूग्ण होतील. या खेरीज प्री. डायबेटीक व्यक्तींची संख्याही मोठी आहे. मधुमेही रूग्णांना मधुमेह नेमका कसा होतो, त्याची लक्षणे काय आहे, मधुमेह झाल्यानंतर कोणती काळजी घ्यावी, याबद्दल डॉ. धिरज छाबडा यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तर डॉ. तरूणा छाबडा यांनी मधुमेही रूग्णांचा आहार कसा असावा, व्यायाम कोणता करावा याबद्दल माहिती दिली. यासाठी मेडले कंपनीचे शोएब, छाबडा हॉस्पीटलच्या डॉ. शिवानी भुतेकर, डॉ. सहेर, डॉ. सलमान यांच्यासह रजत चोविश्या, रूपेश चोविश्या यांनी सहकार्य केले.



# पीसीएमच्या जिल्हाध्यक्षपदी दीपक शेळके यांची फेरनिवड

## शहराध्यक्षपदी सुहास वैद्य तर शहर सरचिटणीसपदी शेख ईस्माइल यांची नियुक्ती





**जालना । प्रतिनिधी -** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पीसीएमच्या जिल्हाध्यक्षपदी दीपक शेळके यांची फेरनिवड करण्यात आली आहे. तर शहराध्यक्षपदी सुहास वैद्य व शहर सरचिटणीसपदी शेख ईस्माइल यांची नियुक्ती करण्यात आली असून फेरनिवड व नियुक्तीचे पत्र राज्य सरचिटणीस महेश जोशी व विजयकुमार सकलेच्या यांच्या हस्ते देण्यात आले.

गेल्या तीन वर्षातील पीसीएमच्या जालना जिल्ह्यातील कार्याची दखल घेत पुन्हा दीपक शेळके यांची जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. त्यांच्या मागील कार्यकाळात पीसीएमच्यावतीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले. पत्रकार व वृत्तपत्रांच्या मागण्या शासन दरबारी लावून धरण्यात आल्या. विविध आंदोलने त्यांच्या नेतृत्वात केल्या गेली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील ढोल बजाओ आंदोलनही त्यांच्या नेतृत्वात करण्यात आले. जिल्ह्यातील विविध पत्रकारांसह इतर संघटनांच्या प्रमुखांना सोबत घेऊन त्यांनी जिल्हा कृती समिती तयार करून विविध प्रश्न शासन दरबारी मांडले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

त्यांच्या फेरनिवड व नियुक्तीबद्दल दीपक शेळके, सुहास वैद्य व शेख ईस्माइल यांचे माजी आ. कैलास गोरंट्याल, शेख मजेद, दत्ता घुले, विजय महाराज फुलंब्रीकर, महेश जोशी, विजयकुमार सकलेचा, ज्ञानेश्वर ढोबळे, धनसिंह सुर्यवंशी, भरत मानकर, विष्णु कदम, प्रा. दत्ता देशमुख, शेख अशफाक, गणेश काबरा, दर्पण सकलेचा, शेख उमर, संदीप भाकरे, माणिक जैस्वाल, आशिष तिवारी, आकाश खरात, शेख नबी सिपोराकर, नरेंद्र जोगड, बद्री उपरे, चेतन बजाज, संतोष भुतेकर, बाबासाहेब गाडेकर, योगेश पिछाडे, गणेश खरात, राहुल भालके, भारत बोराडे, केदार गोरे, दिगांबर मानवतकर, दिलीप कळणे, दिलीप बोराडे, आनंद जाधव, उमेश केंधळे, मनोज घडे यांच्यासह पत्रकारबांधवांनी अभिनंदन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्थानचे ऊर्जा केंद्र

## माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

**मंठा । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्तानचे ऊर्जा केंद्र असून देशासह जगभरातील कोट्यावधी लोकांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेचे राजे असे म्हटले जाते एखाद्या राजाला अनेक उपाध्याय मिळाले असतील परंतु रयतेचा राजा अशी उपाधी मिळालेले जगात केवळ एकच राजे होऊन गेले आणि ते राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. आज देशासह जगभरातील प्रत्येक युवा बांधवांचा आदर्श आणि ऊर्जा स्त्रोत छत्रपती शिवाजी महाराज आहे शिवरायांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आज अनेकांनी आपल्या उन्नतीचा मार्ग शोधला आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

मंठा येथे मोरे पाटील परिवार व शिवसेनेच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव २०२५ निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी श्री लोणीकर बोलत होते यावेळी मंचावर शिवरायांचे सहकारी हिरोजी इंदलकर यांचे तेरावे वंशज श्री संतोष इंदलकर शिवचरित्रकार ह भ प ज्ञानेश्वर महाराज पाटील जळकेकर, विकास इंदलकर यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी संतोष इंदलकर यांना मोरे पाटील परिवाराच्या वतीने शिवछत्रपती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार तर शिवचरित्रकार ह भ प ज्ञानेश्वर महाराज पाटील जळकेकर यांना छत्रपती श्री शिवाजी महाराज शिवस्वराज्य भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी विविध क्षेत्रात नवनवीन उद्योग सुरू करून तरुणाईला प्रेरणा देणाऱ्या अनेक मान्यवरांचा सत्कार व सन्मान देखील प्रेरणा पुरस्काराच्या रूपाने यावेळी करण्यात आला.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे फक्त तीनच गोष्टी सांगितल्या जातात, अफजलखानाचा कोथळा, शाईस्तेखानाची बोटे, आग्राहून सुटका.... पण भावलेले छत्रपती शिवाजी महाराज अनेक अंगाने समजून घ्यायला पाहिजेत. आपल्या आईला सती जाण्यापासून रोखणारे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक क्रांती करणारे, रयतेच्या भाजीच्या देठालासुद्धा हात लावता कामा नये हा आदेश देणारे लोकपालक राजे, सर्व प्रथम हातात तलवारीबरोबरच पट्टी घेऊन जमीन मोजून तिची नोंद त्यांनी ठेवायला चालू केली असे उत्तम प्रशासक, विनाकारण व विना मोबदला झाडं तोडल्यास नवीन झाड लावूनजगवण्याची शिक्षा देणारे पर्यावरण रक्षक, समुद्र प्रवास करण्यास हिंदू धर्मात बंदी होती तो विरोध पत्करून आरमार उभे केले व आधुनिक नौदलाचा पाया रचून धर्मा पेक्षा देश मोठा हा संदेश देणारे स्व-धर्मचिकित्सक, मुहूर्त न पाहता, अशुभ मानल्या गेलेल्या अमावस्येच्यारात्री सर्व लढाया करुन त्या सर्वच्या सर्व लढाया जिंकून अंधश्रध्दा निर्मुलनाचा संदेश देणारे चिकीत्सक राजे, ३५० वर्षांपूर्वी छत्रपती शिवरायांनी सुरु केलेली शिवकालीन पाणी साठवण व्यवस्था अत्यंत प्रभावीपणे राबवणारे जलतज्ञ, ३५० वर्षांपूर्वी दळणवळणाचेकोणतेही साधन नसताना अभेद्य असे १०० राहून अधिक गडकिल्ल्यांचे निर्माते, उत्तम अभियंते, सर्व जातीधर्मातल्या मावळ्यांना समान न्याय देत सामाजिक क्रांतीचा




पाया रचणारे, परस्त्री मातेसमान मानत महिलांना सन्मानाने वागवणारे मातृभक्त, नारीरक्षक, धर्म जातीच्या पलीकडे जाऊन सुखी जनतेचे स्वप्न पाहणारे छत्रपती शिवाजी महाराज अशी छत्रपती शिवाजी महाराजांची विविध रूपांचा अभ्यास आणि विचार प्रत्येकाने केला पाहिजे. असे मत यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले. ज्या मान्यवरांनी शून्यातून विश्व निर्माण केलं आणि नवीन उद्योगाची उभारणी करत तरुणाईला एक चांगला संदेश दिला अशा नवउद्योजकांना छत्रपती श्री शिवाजी महाराज नवउद्योजक प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये सुनीता नरवडे जालना, शकुंतला नागवे भाटेपुरी, नारायण वाशिंबे आष्टी, उद्धव शेरे परतुर, सुरेश कोल्हे आष्टी, सुनील वरकड मंठा, भागवत जगताप आष्टी, अनिल मुळे वाटूर फाटा, यशोदा खंडागळे कटाळा खुर्द, इंद्रायणी भुतेकर कटाळा बुद्रुक, मीरा उबाळे वाई, कैलास जाधव धोंडी पिंपळगाव, सरिता चव्हाण मेसखेडा, निर्मला सुभेदार संकनपुरी, श्रीकृष्ण टेकाळे आष्टी, मीना सोळंके सोयांजना या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या पुरस्काराच्या माध्यमातून अधिकाधिक नवउद्योजक घडावेत त्यांना प्रेरणा मिळाली अशी अपेक्षा असल्याचे शिवजन्मोत्सवाचे आयोजक प्रा सहदेव मोरे पाटील यांनी स्पष्ट केले.

शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे आयोजित रक्तदान शिबिर कार्यक्रमात ५६ रक्तदात्यांनी स्वेच्छा रक्तदान केले. यावेळी अंकुशराव बोराडे अंकुशराव अवचार बाबुराव शहाणे गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे राजेश मोरे कैलास बोराडे अजय अवचार, वैजनाथ बोराडे, नितीन राठोड, विठ्ठलराव काळे गणेशराव शहाणे गणेशराव बोराडे सुरेश सरोदे नागेश घारे मुस्तफा पठाण, अमोल मोरे, प्रसादराव गडदे बाबाजी जाधव जानकीराम चव्हाण सचिन राठोड आनंद जाधव नितीन सरकटे रामकिसन बोडखे परमेश्वर शिंदे मनोज देशमुख प्रकाश गबाळे सोपान वायाळ दत्तराव खराबे राजेभाऊ खराबे वसंत बागल रामकिसन मुसळे कैलास चव्हाण सुभाष बागल कार्यक्रमाचे आयोजक बाबासाहेब पाटील मोरे, प्रा.सहदेव मोरे पाटील डॉ. कल्याण मोरे पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सहकार बँक कॉलनीत गजानन महाराजांचा प्रगट दिन सोहळा उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** येथील सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प. पू. डॉ. भगवान महाराज आनंदगडकर यांच्या कृपाशिर्वादाने गजानन महाराजांचा प्रगट दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. तर उद्या हभप श्री. संत डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे काल्याचे किर्तन आणि नंतर महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार असल्याचे संस्थानचे सचिव संपतराव पाटील व विश्वस्त मंडळाने कळविले आहे. दरम्यान, काल रात्री हभप उध्दव महाराज वाघमारे यांचे किर्तन झाले. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या ओवींवर आधारित कीर्तन केले. या कीर्तनातून त्यांनी आजच्या जीवनावरील विविध उदाहरणे आपल्या कीर्तनातून दिली. त्यावेळी उपस्थितांनी त्यांना चांगलीच दाद दिली. ज्यांची संपूर्ण माया ही देवाजवळ आहे, ते खरे भाग्यवंत आणि सुखी असल्याचेही सांगून ते म्हणाले की, कुणाला अंतरंग आवडतात तर कुणी बाह्य रंगावर जातात. परंतू मनुष्याचे अंतरंग नेहमीच चांगले आणि सुंदर असायला हवे. तन आणि धन यां मधला फरकही त्यांनी यावेळी स्पष्ट करुन सांगितला.

# साखर कारखान्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** खा. डॉ. कल्याण काळे यांनी क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त कौशल सिंग यांच्यासोबत बैठक घेऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने आवश्यक कारवाई करण्याचे आदेश दिले.

या बैठकीत निवृत्तीवेतन, भविष्य निधी आणि इतर थकबाकीच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. जालना सहकारी साखर कारखाना मर्या. रामनगर येथील अनेक कामगारांना भविष्यातील सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली पेन्शन आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची विलंबामुळे अडचण निर्माण झाली आहे.

कामगारांच्या मागणीनुसार- युएएन नंबर न मिळणे: २०१४ पासून सुरू असलेल्या प्रक्रियेत अनेक कामगारांना अद्याप णछ क्रमांक मिळालेला नाही, यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

थकबाकी रक्कम खात्यात जमा करणे: साखर कारखान्याने २०१० मध्ये भरलेली ५,८३,२२,३४२/- ची रक्कम अजूनही कामगारांच्या खात्यात जमा झालेली नाही, ती त्वरित वर्ग करावी.

पेन्शन वाढीव मिळण्यासाठी कार्यवाही: न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव पेन्शन मंजूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तत्काळ करण्यात यावी.

PF थकबाकी भरपाई: कारखान्याने कर्मचार्यांच्या वेतनातून कपात केलेली झऋ रक्कम दंड व व्याजासह भरावी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या खात्याची संपूर्ण माहिती पुरवावी.



खा. डॉ. काळे यांनी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जालना आणि परिसरातील शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.या बैठकीस जालना साखर कारखान्याचे श्री रामेश्वर डोंगरे, संतोष देशमुख, साहेबराव कांदे, दत्तू जुंबड, भिकाजी गवार, ज्ञानेश्वर औटे, एकनाथ पठाडे, अप्पासाहेब अवघड, अरुण वझरकर आदींची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.